# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 332/2022 दिनांक : 28.08.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**भोकर** :-दिनांक 26.08.2022 रोजी 18.00 वा. ते 18.30 वा. चे दरम्यान, **आरोपीचे राहते घरासमोर, सावरगाव ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस धक्का देवून झटापट करुन हुज्जत घालून मारहाण केली व चाकुने फिर्यादीचे पोटात मारुन गंभीर जखमी करुन खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी गजानन मारोती नकितवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. सावरगाव ता. भोकर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 302/2022 कलम 307,324,323,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री पाटील, मो. नं. 9850550670** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :-

**विमानतळ** :-दिनांक 26.08.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **संजय देवराव पुयड यांचे घरासमोर कामठा खुर्द, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे सर्विसींग सेंटरचे दुकान बंद करुन घराकडे जात असताना आरोपीचे घरासमोर आला असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचा रस्ता आडवून मागील वादाचे कारणावरुन वाद करुन हातातील काठीने डावे हातावर व पाठीवर मारहाण केली तसेच लोखंडी रॉडने डोक्यात, पाठीवर मारहाण करुन दुखापत केली व फिर्यादीचे हातातील दोन अंगठया व नगदी असा एकुण 62,000/-रूपयाचा माल जबरीने काढुन घेतला. वगैरे **फिर्यादी जिवन किशनराव इंगळे वय 43 वर्षे, व्यवसाय शेती रा. कामठा खुर्द, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 292/2022 कलम 394,341,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री गिते, मो.क्रं. 7387791899** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :-

**1)भोकर** :- दिनांक 26.08.2022 रोजी 17.00 वा. ते दिनांक 27.08.2022 रोजी 07.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या किरायाचे घरी कृष्णनगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे पोळा सनानिमित्त परिवारासह स्वतःचे घराला कुलूप लावून बाहेर गावी गेले असता घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन कपाट फोडून कपाटातील नगदी 65,000/-रूपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गणेश सटवाजी जगीलवाड, वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. राज जवळा, ता. मुधोळ जि. निर्मल ह.मु. श्रीकृष्णनगर, भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 303/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2138 शिंदे, मो.क्रं. 9552500871** हे करीत आहेत.

**2)इतवारा** :-दिनांक 25.08.2022 रोजी 12.00 ते दिनांक 26.08.2022 रोजी 04.00 वा. चे दरम्यान, **पंचशील नगर, नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे दुकानाचे खिडकीचे टप्परीचे गजाळी वाकवून आत प्रवेश करुन दोन एम्प्लीफायर एकुण किंमती 13,000/-रुपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी राहुल माणिकराव भालेराव वय 42 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. पंचशिलनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 233/2022 कलम 461 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2557 हंबर्डे, मो.क्रं. 9552562557** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :-

**किनवट** :- दिनांक 25.08.2022 रोजी 19.30 ते 20.30 वा. चे दरम्यान, **सागर बारच्या समोर केके गार्डनजवळ गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो.सा. क्रं. एम.एच./26-एडब्ल्यु-7469 किंमती 15,000/-रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी संतोष रामराव बेंबळगे, वय 33 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शिवशंकर नगर गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 169/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवाड, मो.क्रं. 9850061133** हे करीत आहेत.

## 5)मोबाईल चोरी :-

**शिवाजीनगर** :-दिनांक 26.08.2022 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **वसंतनगर,नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा बाजारात भाजीपाला विकत घेत असताना त्यांच्या शर्टच्या वरच्या खिशातील मोबाईल किंमती 30,000/- रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी मनीषकुमार हानमंतराव पेन्नेवार, वय 43 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. वसंतनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 320/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2692 ढोले, मो.क्र. 9623002692** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 24.03.2021 रोजी ते आजपर्यंत, **खुतूफशाही मोहल्ला काझी वाडा औसा जि. लातुर ह.मु. रहेमानिया कॉलनी, नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस माहेराहुन व्यापारासाठी पाच लाख रूपये घेवून ये म्हणुन तसेच तुला कामधंदा येत नाही म्हणुन उपाशी पोटी ठेवून शिवागाळ करुन मारहाण केली व तिचा शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 523/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2306 चंचलवाड, मो.क्रं. 9730192361** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद** :– दिनांक 27.08.2022 रोजी 18.20 वा. चे सुमारास, **रेल्वेस्टेशन गेट नं. 1,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या शस्त्र (खंजर) किंमती 300/–रुपयाचे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/152 मनोज बापुसिंग परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 302/2022 कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1673 डोईवाड, मो.क्र. 9130164357** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 27.08.2022 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **चरणसिंग महाराज यांच्या मळयाजवळ लालवाडी येथे टिनशेड मध्ये चालु असलेल्या हॉटेल मध्ये, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 4200/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री माणिक देवराव हंबर्डे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 522/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2306 चंचलवाड, मो.क्र. 9730192361** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड